स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/लोनिवडणूक/२०२४/ 1619

दिनांक- 10 APR 2024

## परिपत्रक –

**विषय- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता लोकसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुटटी बाबत...**

संदर्भ- महाराष्ट्र शासन राजपत्र,सामान्य प्रशासन विभाग यांची ०३/०४/२०२४ रोजीची अधिसूचना.

सर्व संस्था प्रमुख/कार्यालयप्रमुख यांना वरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्हयामध्ये परिशिष्ट-१ प्रमाणे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पाच टप्प्यात घेतली जाणार आहे.निवडणुक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुटटी जाहीर करण्यात आली आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १०, अंक १८(४)] बुधवार, एप्रिल ३, २०२४/चैत्र १४, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ४.००

असाधारण क्रमांक ३८

प्राधिकृत प्रकाशन

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हाधिकारी विभागीय कार्यालय पुणे. 05 APR 2024 आवक क्र. 3629

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ०३ एप्रिल, २०२४.

अधिसूचना

क्रमांक सार्वसु-१०२४/प्र.क्र. ३३/जपुक (२९).— परक्राम्य संलेख अधिनियम,१८८१ (१८८१चा २६) च्या कलम २५ मध्ये दर्शविलेल्या व भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक ३९/१/६८-जेयुडीएल-तीन, दिनांक ८ मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे सार्वत्रिक लोकसभा निवडणुका-२०२४ च्या अनुषंगाने खालील अनुसूचित दर्शविलेल्या मतदानाच्या दिवशी संबंधित लोकसभा मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे :—

| अ.क्र | मतदानाचा वार व दिनांक | लोकसभा मतदार संघाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|
| १. | शुक्रवार, दि. १९ एप्रिल, २०२४ | ९-रामटेक, १०-नागपूर, ११-भंडारा-गोंदिया, १२-गडचिरोली-चिमूर, १३-चंद्रपूर. |
| २. | शुक्रवार, दि. २६ एप्रिल, २०२४ | ५-बुलडाणा, ६- अकोला, ७-अमरावती, ८- वर्धा, १४-यवतमाळ-वाशिम, १५-हिंगोली, १६-नांदेड, १७-परभणी. |
| ३. | मंगळवार, दि. ०७ मे, २०२४ | ३२-रायगड, ३५-बारामती, ४०-उस्मानाबाद, ४१-लातुर, ४२-सोलापूर, ४३-माढा, ४४-सांगली, ४५-सातारा, ४६-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, ४७-कोल्हापूर व ४८-हातकणंगले. |
| ४. | सोमवार, दि. १३ मे, २०२४ | १-नंदुरबार, ३-जळगांव, ४-रावेर, १८-जालना, १९-औरंगाबाद, ३३-मावळ, ३४-पुणे, ३६-शिरुर, ३७-अहमदनगर, ३८-शिर्डी व ३९ -बीड. |
| ५. | सोमवार, दि. २० मे, २०२४ | २-धुळे, २०-दिंडोरी, २१-नाशिक, २२-पालघर, २३-भिवंडी, २४-कल्याण, २५-ठाणे, २६-मुंबई उत्तर, २७-मुंबई उत्तर-पश्चिम, २८ - मुंबई उत्तर-पूर्व, २९ - मुंबई उत्तर-मध्य, ३०-मुंबई दक्षिण-मध्य व ३१-मुंबई दक्षिण. |

२. ही सार्वजनिक सुट्टी उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघांच्या बाहेर असतील त्यांनादेखील लागू राहील. तसेच ही अधिसूचना राज्य व केंद्र शासनाच्या कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम व इतर प्रतिष्ठान यांनाही लागू राहील.

३. सदर अधिसूचनाची माहिती व जनसंपर्क विभाग यांनी वृत्तपत्र व इतर प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रो. दि. कदम-पाटील,
शासनाच्या उप सचिव.